ॐ

# अध्याय तिसरा

१ पार्थ पुसे, ‘गा, बुद्धि मानिसी तूं कर्माहुनि थोर
आणि केशवा, मज नियोजिसी कर्मांत अशा घोर ! १

स्थित-प्रज्ञ हो म्हणसी चि तरी कां प्रशंसिसी कर्म ?
मजसी हिंसा-धर्म कां असा ? न कळे ह्याचें वर्म २

२ बोल दुहेरी घालिती जणूं मोहांत मती माझी
मज सुनिश्चयें सांग एक तें श्रेयस्कर जें आजीं.’ ३

३ म्हणे जनार्दन, ‘ऐक निर्मळा, सांगितला ह्या लोकीं
मत्प्राप्तीचा द्वि-विध मार्ग जो पूर्वी तो चि विलोकीं ४

शीघ्र पावती जिथें सांख्य ते ज्ञान-योग आचरुनी
तिथें चि जाती यथा-क्रम तसे योगी कर्में करुनी ५

जशी जयाची असे पात्रता तसा मार्ग-संबंध
मत्प्राप्ति-पथीं नसे सर्वथा प्रमुख गौण हा भेद ६

ज्ञानाधारें सिद्धि पावती ज्ञानी; निर्मळ-चित्तें
कर्माधारें पावती चि ते योगी परम-गतीतें. ७

४ न च लाभे तें नैष्कर्म्य इथें कर्मारंभ न करुनी
तसें निपटुनी कर्म सांडुनी सिद्धि न पावे कोणी ८

जाण निश्चयें जया साधका नैष्कर्म्य-पदीं आस्था
तयें सर्वथा ह्या कर्म-पथा न च सांडावें पार्था ९

५ क्षण हि न कोणी कर्मावांचुनि जगीं रिकामा राहे
प्रकृति-गुण तया अवश करुनियां कर्म करविती पाहें १०

कर्म सोडिलें म्हणतां चि बळें तरि तें सुटतें काय ?
मुख न च बोलें ? काय विसरले चालणें चि ते पाय ? ११

सांग नासिका-रंध्र बुझालें ? काय न घे तें गंध ?
कीं नेत्रींचें तेज लोपलें ? श्रवणीं न च ये नाद ? १२

रस ना चाखे रसना ? किंवा जाग्रत्-स्वप्न-सुषुप्ति
काय लोपती तीन ह्या स्थिती ? क्षुधातृषादिक आर्ती ? १३

असो असें हें नच का राहे श्वासोच्छ्वास हि देहीं !
नको धडपडूं कर्म-त्यागीं नको पडूं संदेहीं १४

प्रकृति-संग तोंवरी कुणातें कर्म-त्याग न घडतो
'करीन मी' जो म्हणे तयाचा उरे मात्र आग्रह तो !! १५

इतर कर्म तें सुटे न च तुटे हटें हि इंद्रिय-धर्म
वर्म जाणुनी कर्म करावें विहित हें चि हित परम १६

६　केवळ कर्मेंद्रियें रोधुनी मनांत चिंती भोग
मिथ्याचारी मूढात्मा तो तया न कळला योग　१७

७　परी इंद्रियें मनःसंयमें आवरुनी राबवितो
स्वभाव-कर्मीं अनासक्त तो विशेष गणिला जातो　१८

८　नियत कर्म तूं करीं कर्म तें थोर अकर्माहून
देह-धारणा तीहि घडे ना तुज कर्मावांचून　१९

९　तरी प्रसंगें प्राप्त कर्म तें करीं संग सोडून
स्व-कर्म करणें निःसंगपणें ही योगाची खूण　२०

स्व-कर्म करितां कर्म-मुक्तता सहज तुला लाभेल
म्हणुनी पाहे तुज कर्म चि हें मोक्ष-पदा नेईल !　२१

स्वकर्म-सेवा हा नित्य नवा महा-यज्ञ जाणावा
नसे वानवा हा चि मानवा मोक्ष-सुखाचा ठेवा　२२

तुटे जेधवां स्वकर्म-सेवा-महायज्ञ-संबंध
पडे तेधवां जगांत जीवा हा सांसारिक बंध　२३

१०　पूर्वीं केली प्रजापतीनें जधीं सृष्टि निर्माण
तदा निर्मिला महा-यज्ञ हा प्रजांसवें तूं जाण　२४

आणि तो म्हणे, ‘अहो, प्रजा हो, हें यज्ञानुष्ठान
अखंड करणें अहेतुकपणें धर्म हा चि सु-महान　२५

नको पाळणें व्रतें नियम ते नको चि तीर्थाटन तें
नकोत नाना देह-दंडना त्यजा मंत्र-तंत्र हि ते　२६

स्व-कर्म-सेवा यज्ञ हा तुम्हां सेव्य एकला जगतीं
काम-धेनु ही करी उन्नति सकल कामना-पूर्ति २७

११ यज्ञ-द्वारा करा सुर-वरां समृद्ध आणिक तुष्ट
प्रसन्न-चित्तें पुरवितील ते सकल मनोरथ इष्ट २८

अशी चि साची परस्परांची जडे भावना तेथें
देव-देवता प्रसन्न होतां श्रेय साधुनी घ्या तें २९

१२ प्रसन्न होउनि देवता-गणीं दिली सकल संपत्ति
तया अर्पिल्याविना भोगितो स्वयें चि जो मूढ-मति ३०

देव न लक्षी संत उपेक्षी न जो तोषवी स्वजन
जरी भुकेला अतिथी आला न दे तयासी अन्न ३१

विषय-स्वादा लुब्ध सर्वदा होउनियां उन्मत्त
भोग सर्व हे भोगूं पाहे स्वयें देवता-दत्त ३२

तरी मागुता तया सर्वथा अपाय आहे थोर
दंडील जधीं काळ-पुरुष तो गणुनि तयातें चोर ३३

तदा न सुटका तरी कां फुका अधोगतीतें जावें
त्याहुनि बरवें तुम्ही सर्वदा स्व-धर्म-निरत रहावें. ३४

असें अर्जुना, स्व-प्रजाननां शिकवी नाना रीती
तो प्रजा-पति तें चि संप्रति सांगितलें घे चित्तीं ३५

१३ धर्मोपार्जित धन-वैभव तें यज्ञ-करण मानावें
आदिकारणीं अर्पण करुनी स्व-धर्में चि भोगावें ३६

स्वकर्म-सेवा-यज्ञ-साधनीं शेष राहिलें अन्न
आप्त-इष्ट-गणगोत्र-संगतीं सुखें चि तें भक्षून ३७
संत सर्वथा होती पार्था सकल-दोष-निर्मुक्त
सर्व हि दुरितें हरी अन्न तें यज्ञ-शिष्ट-संभुक्त ३८
परी रांधिती अन्न दुर्मती केवळ अपुल्यासाठीं
ते चि पातकी पाप भक्षिती ठेवुनि भोगासक्ति ! ३९
परमेशातें जें तोषवितें अन्न तें न सामान्य
विश्व-जीवना हेतु म्हणुनि तें ब्रह्म-रूप परिपूर्ण ४०
१४ अन्नापासुनि जाण अर्जुना, प्राण्यांची उत्पत्ति
पर्जन्यांतुनि तशी होतसे अन्नाची संभूति ४१
यज्ञीं जन्मे पर्जन्य तसा यज्ञा कर्मीं जन्म
१५ त्या कर्मातें जन्म देतसे प्रकृति-रूप जें ब्रह्म ४२
माया-ब्रह्मा जन्म अक्षर-ब्रह्मापासुनि जाण
म्हणुनी यज्ञीं सर्व-व्यापीं ब्रह्म चि भरलें पूर्ण ! ४३
१६ असें प्रेरिलें यज्ञ-चक्र हें न जो चालवी लोकीं
विषय-लुब्ध तो पापी त्याचें जिणें व्यर्थ अवलोकीं ४४
ऐक अर्जुना, मूर्ति ह्या जगीं लाहुनि नर देहाची
ते मूढ-मती जे नर खंती बाळगिती कर्माची ४५
१७ परी रंगला आत्म-सुखीं जो जया आत्म-संतृप्ति
आत्म्यांत चि जो संतुष्ट तया कार्य उरे ना जगतीं ४६

असुनीं देही तया न राहे देह-धर्म-संबंध
म्हणुनि तयाचा कर्तव्याचा सुटला सहजें बंध ४७

१८ कर्म तयानें केलें अथवा न च केलें ह्या जगतीं
तरि धनंजया, अ-संगा तया काय तयाची महती ! ४८

नसे तयाचा मोह गुंतला इथें भूत-मात्रांत
देह विसरला अखंड रमला जो आत्मानंदांत ४९

परी अर्जुना, जोंवरी मना भेटे ना हें ज्ञान
कर्म-साधना तोंवरी जना उचित सर्वथा जाण ५०

१९ तरी नित्य तूं निःसंगपणें निज-कर्तव्य करावें
कर्में करुनी अलिप्त नर तो कैवल्य-पदा पावे ५१

२० कीं कर्म-बळें सिद्धि पावले जनकादिक ते पाहीं
लोक-संग्रहीं दृष्टि ठेवुनी करीं कर्म तें तूं हि ५२

डोळस जेवीं मार्ग दाखवी अंधा हातीं धरुनी
प्रकट करावा अज्ञ-बांधवां तेविं धर्म आचरुनी ५३

२१ श्रेष्ठ आचरे तें चि अनुसरे जन हि सकळ सामान्य
प्रमाण मानी जें तो तें तें तया होतसे मान्य ५४

२२ करावें असें मिळवावेंसें नसे चि पार्था, कांहीं
मज त्रि-भुवनीं तरी हि कर्मीं वर्ततों चि मी पाहीं ५५

२३ त्यजुनी आळस कर्मांत असा जरी न मी वागेन
करितील तरी लोक हि माझें सर्वथैव अनुकरण ५६

२४ कर्म न केलें मी चि तरी हा जन होइल उत्सन्न
आणि संकरद्वारा घाता कारण मी होईन ५७

२५ मूढ गुंतुनी करिती कर्में तशीं चि तीं ज्ञात्यानें
लोक-संग्रहा इच्छुनी इथे निःसंगपणें करणें ५८

कर्में करुनी जनां वळवुनी सत्पथासि लावावें
लौकिकांत ह्या न च धनंजया, तयें अलौकिक व्हावें ५९

२६ अंगावरचें दहा दिसांचें मूल करी स्तन-पान
तया उचित तें, केविं जेवि तें मधुर जरी पक्वान्न ? ६०

म्हणुनि तयातें द्यावें न च तें; तेविं सकळ सामान्य
अज्ञ जन तयां न च धनंजया, प्रकटावें नैष्कर्म्य. ६१

कर्मीं जडले तरी तयांचा बुद्धि-भेद न करावा
सत्कर्माचा मार्ग तयांना आचरुनी दावावा ६२

आणि करावी नितांत बरवी स्तुती चि सत्कर्माची
परी अंतरीं स्मृती असावी सदैव नैष्कर्म्याची ६३

२७ कर्में निरुतीं सर्वथैव तीं प्रकृति-गुणास्तव होती
धरुनि अहंता मानी ‘कर्ता मी’ ऐसें मूढ-मति ६४

अशी अहंता थोर जयाची अविवेकी जो मूढ
तया अर्जुना, प्रकटावा ना परमार्थ असा गूढ ६५

२८ परि जो पाही गुण-कर्में हीं स्वयें वेगळा राही,
गुण चि खेळती गुणीं जाणुनी न तो गुंतुनी जाई ६६

जरी इंद्रियें आपआपुले विषय सेविती देहीं
देह-अहंता त्यजुनी ज्ञाता तें साक्षित्वें पाही ६७

२९ प्रकृति-गुणें जे भ्रमले सहजें मंद-मती अज्ञानी
ते चि बांधिले गुण-कर्म-बळें विविध-विषय-रज्जूंनीं ६८

न ये चाळवूं तयांसि सुज्ञें सांगुनियां नैष्कर्म्य
उद्धरावया तयां सत्क्रिया बरवी सु-कर सु-गम्य ६९

३० कर्म-मात्र तें मदर्पण करीं दे अध्यात्मीं चित्त
आशा ममता सांडुनी सुखें झुंज अर्जुना, येथ ७०

धनुष्य हातीं घेउनी रथीं उभा ठाक निःशंक
वीर-वृत्तिनें रणीं झुंजुनी यश जोडीं अ-कलंक ७१

दुष्ट पातकी वधुनि घातकी रणार्थ जे उद्युक्त
करीं सु-धीरा, ही वसुंधरा भारापासुनि मुक्त ७२

३१ अनुष्ठिती जे मत हें माझें संतत निष्ठावंत
निर्मत्सर ते जरी नेणते होती कर्म-विमुक्त ७३

३२ परि जे कोणी दोष काढुनी न च अनुष्ठिती मत हें
हीन-विवेकी ज्ञान-शून्य ते नाश पावती पाहें ७४

३३ पतंग दीपीं झडप घालितां अचूक पावे मरण
आत्म-विघाता हेतु सर्वथा तसें चि विषयाचरण ७५

तिथें इंद्रियां लुब्ध व्हावया मुळीं न लागे वेळ
बळें तयांचे लळे पाळणें हा सर्पाशीं खेळ ! ७६

म्हणुनि इंद्रियें चेतवूं नये विषयीं ज्ञात्यानें हि
तटस्थ-वृत्ती ठेवुनि चित्तीं स्वस्थ असावें देहीं ७७

सुजाण झाला तरि हि तयाला प्रकृति-धर्म ना सुटती
संस्कारवशें व्यवहार तसे प्रकृतिसारिखे होती ७८

प्रकृति-धर्म जो जसा जयाचा अवश होउनी त्यातें
प्राणि-मात्र ते तसे वागते न चले निग्रह येथें ७९

दोन दिसांचा नश्वर साचा पराधीन हा देह
निज-स्वभावें पंचत्वातें पावे निःसंदेह ८०

कष्ट करुनियां स्वयें जगीं ह्या उपार्जिला जो अर्थ
धर्म सोडुनी जरी वेंचिला केवळ भोग-सुखार्थ ८१

तरी पसारा संसाराचा आवरितां देहान्तीं
भोग-सुखें तीं विलया जातीं नुरे तयांची महती ८२

इह-परलोकीं धर्म एकला देई शाश्वत शांति
म्हणुनि पांडवा, स्वधर्म-सेवा-मार्ग आचरीं जगतीं ८३

३४ आपआपुले विषय सेविती सर्व इंद्रियें जाण
विषयीं प्रीति-द्वेष हि होती स्वभावतां निर्माण ८४

परंतु सुज्ञें कधीं तयांच्या आहारीं न च जावें
पथीं चोरटे ओळखुनी ते अंतर्निष्ठ रहावें ८५

३५ जरी भारता, धर्म आपुला उणा गुणांनीं असला
तरि आचरितां तो चि तुज भला इह-परलोकीं झाला ८६

सुगम वाटला पर-धर्म तसा आचरावया तूतें
हांवरेपणें तो आचरणें न तरी श्रेयस्कर तें ८७

का सांग बरें घरें मनोहर इतरांचीं देखून
अपुली असती पर्ण-कुटी ती टाकावी मोडून ? ८८

भलें स्व-धर्मीं मरण परि जिणें पर-धर्मीं भय-कारी
धर्म-तत्त्व हें नित्य जाणुनी स्व-कर्म तें स्वीकारीं.' ८९

३६ पार्थ मागुता पुसे, 'अनंता, सांगें समजावून
इच्छी न च तें तरी हि होतें कां अनुचित हातून ? ९०

इथें प्रेरितें कोण नरातें बळें चि पापाचरणीं
धनी कुळातें जसा राबवी जणुं वेठीला धरुनी ?' ९१

३७ वदे श्री-पति अर्जुनाप्रति 'काम तसा हा क्रोध
वैरी जो कां करी साधकां सन्मार्गीं प्रतिरोध ९२

रजोगुणीं जो जन्म पावला असे महा-पापिष्ट
किती मिळाले भोग तरी जो कधीं न होई तुष्ट ! ९३

३८ जसा धुरानें अग्नि झांकिला मळें आरसा जाण
कीं वारेनें गर्भ वेष्टिला तसें चि कामें ज्ञान ९४

३९ काम अधाशी हा ज्ञात्याशीं संतत करुनी वैर
झांकी ज्ञाना म्हणुनि तें जना गमे गहन गंभीर ९५

सहजें पार्था, दूर सारितां कामाचें आवरण
स्वयं-प्रकाश स्वतःसिद्ध तें प्रकटें आत्म-ज्ञान ९६

४० मन-बुद्धीचा दशेंद्रियांचा घेउनियां आधार
ज्ञान झांकुनी काम मोहिनी घाली हा अनिवार ९७
४१ विज्ञान तसें ज्ञान हि टाकी जो कीं झांकोळून
त्या पाप्यातें दूर करावें इंद्रिय-जय साधून ९८
कामानल हा नष्ट कराया नाना यत्न करून
काया-वाचा-मनें झगडती साधक सरसावून ९९
परी करावे उपाय ते ते अपाय होती तेथें
जसें मागुतें प्रदीप्त करितें इंधन तें अग्नीतें ! १००
अशीं इंद्रियें हटातटानें होती ना स्वाधीन
आणि साधकां काम सारखा छळुनी करितो दीन १०१
संत-संगतीं परमात्म-रति उपजतां चि ती चित्तीं
कामादिक ते साधकांप्रति स्वयें सोडुनी जाती १०२
मन-बुद्धीसह चित्त हि होतां निज-रूपीं तल्लीन
तदा साधका सहज साधला इंद्रिय-जय संपूर्ण १०३
४२ थोर इंद्रियें त्याहुनि मन तें थोर त्याहुनी बुद्धी
त्या बुद्धीहुनि परमात्मा जो तो चि थोर निरुपाधि १०४
४३ त्या आत्म्यातें जाणुनि राहें आत्म-बळें स्थिर तेथें
आणि संहरीं अजिंक्य ऐशा काम-रूप शत्रूतें !’ १०५

येथें भावार्थ गीतेचा तृतीयाध्याय संपला ।
कर्म-योग विशेषत्वें असे ह्यांत निवेदिला ॥ ३ ॥